महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन शुद्धीपत्रक क्रमांकः आरटीएस २०१७/प्र.क्र.१६६/१८(र.व का.)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १२ मार्च, २०१८.

वाचा : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक २०१७ / प्र. क्र. १६६ / १८ (र. व का.), दिनांक २२ जानेवारी, २०१८.

शुद्धीपत्रक :

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची राज्यात व विशेषत: जिल्हापातळीवर प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचे संनियत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना दिनांक २२ जानेवारी, २०१८ च्या परिपत्रकान्वये, "नोडल अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याऐवजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निदेशास अनुसरुन प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना **"नियंत्रक अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन परिपत्रक, महसूल व वन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १४ / २०१८ / ई १-अ, दिनांक ६ मार्च, २०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३१२१८०९५३८७०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhananjay Manik Kaned

Digitally signed by Dhananjay Manik Kaned
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e18fb94e20928aa0c627f26f27a422b56941d8107493189c499f0bcb736511ed, cn=Dhananjay Manik Kaned
Date: 2018.03.12 18:10:32 +05'30'

(ध. मा. कानेड)

उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रत,

१.मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,

२.सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,

३.मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),

४.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव (५ प्रती),

५.मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव (५ प्रती),
६.मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
७.मा.मुख्य सचिवांचे कार्यालय,
८.मा.महाअधिवक्ता,महाराष्ट्र राज्य
९.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१०.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (५ प्रती),
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१३.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (२ प्रती),
१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६.मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१७. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१८.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१९.सर्व मंत्रालयीन विभाग
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.सर्व जिल्हाधिकारी,
२२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२४.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२५.निवड नस्ती.(कार्यासन-१८)